MHRT050009402022 **दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६९/२०२२ मधील**

**निशाण २७ खालील आदेश**

**श्रीम. कुंदा पांडुरंग मोरे व. ३**

**वि.**

**प्रविण पांडुरंग मोरे व. ४**

प्रस्तुतचा अर्ज हा सामनेवाला यांनी त्यांच्याविरुध्द झालेला 'विना म्हणणे' चा आदेश रद्द होवून मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जातील कथनाप्रमाणे, सामनेवाला यांना अर्जाची नोटीसची बजावणी न होता ते याकामी हजर झालेले आहेत. त्यांना अर्जाच्या अनुषंगाने आजअखेर कोणतेही कागदपत्र मिळालेले नाहीत. सदरचे प्रकरण हे म्हणणे देण्याकरीता नेमण्यात आले असताना त्यांनी या न्यायालयास सदरचा अर्ज चालविणेस अधिकार नसल्याबाबत अर्ज दाखल केला होता. तो अर्ज प्रलंबित असल्यामुळे सामनेवाला यांनी म्हणणे दाखल केले नव्हते. अधिकार क्षेत्राबाबतचा अर्ज निर्णित होण्यापुर्वी सामनेवाला हे म्हणणे देण्यास बांधील नाहीत. असे असताना न्यायालयाने त्यांच्याविरुध्द म्हणणे नाहीचा आदेश पारित केला आहे. सदरचा आदेश रद्द न झाल्यास सामनेवाला यांचे अपरिमित नुकसान होवून त्यांच्यावर अन्याय होणार आहे. सदरचे कामी सामनेवाला यांना यशाची खात्री आहे त्यामुळे न्यायाच्या कारणास्तव त्यांच्याविरुध्द झालेला म्हणणे नाहीचा आदेश रद्द करुन त्यांचे म्हणणे पटलावर घेण्याची प्रस्तुत अर्जाद्वारे विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर अर्जदार यांनी म्हणणे देवून अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांनी सदरचा अर्ज खोटा व खोडसाळ असुन तो अर्जदार यांना मान्य नाही. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदारच्या हिताविरुध्द आहे. सामनेवाला यांनी विलंब करण्याच्या हेतुने अर्ज

दिला आहे. तरी सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा . यदाकदाचित न्यायालयाने सदरचा अर्ज मंजुर केल्यास रक्कम रु. १००० कॉस्ट देण्याचा आदेश करावा असे म्हणणे दाखल केले आहे.

**४.** अर्ज, म्हणणे व प्रकरणाचा अभिलेख पाहिला व त्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजूच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरीता दाखल केला आहे. याकामी दि. ०५.१२.२०२२ रोजी सामनेवाला हे हजर झाले आहेत. तद्नंतर दि. ०९.०३.२०२३ पर्यंत सामनेवाला यांनी म्हणणे दाखल करण्याकरीता अवधी देण्यात आला होता. परंतु त्यांनी म्हणणे दाखल केलेले नसल्याने त्यांच्याविरुध्द म्हणणे नाहीचा आदेश पारित करण्यात आला आहे. सामनेवाला यांनी नि.२१ कडे या न्यायालयास मुळ अर्ज चालविण्याचे अधिकारक्षेत्र नसल्याबाबत अर्ज दाखल केला आहे. तो निर्णित झाला नसल्याने सामनेवाला यांनी म्हणणे दाखल केले नसल्याचे कथन लक्षात घेता सदरचा अर्ज हा निर्णित होण्याच्याआधीच सामनेवाला यांना म्हणणे देता येत नाही असे नाही.

**६.** सदर प्रकरणात नैसर्गिक न्याय तत्वांचा विचार करता दोन्हीही बाजूंना आपले म्हणणे मांडण्याची पुरेपूर संधी देणे गरजेचे आहे. तसे केल्याने अर्जदार यांचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट प्रस्तुत सामनेवाला यांचे म्हणणे अभिलेखावर घेतले नाही तर प्रस्तुत सामनेवाला यांचे फार मोठे नुकसान होवून अर्जाचा योग्य त्या गुणदोषांवर निकाल होणारा नाही. दोन्ही बाजू पटलावर आल्या नाहीत तर अर्जाचा निकाल नैसर्गिक न्याय तत्वाने होणार नाही. सामनेवाला यांनी म्हणणे न दिल्याने प्रस्तुतचे प्रकरण काही काळाकरीता प्रलंबित राहिले असले तरीही त्यांचे म्हणणे नैसर्गिक तत्वानुसार नाकारता येणार नाही. सबब सदर अर्जाचा निकाल योग्य न्यायतत्व व गुणदोषांवर होणे गरजेचे असल्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१.    अर्ज (नि. २७) मंजूर करण्यात येतो.

२.    सामनेवाला यांच्याविरुध्द झालेला 'विना म्हणणे' चा आदेश रद्द करणेत येवून त्यांचे म्हणणे दाखल करून घेण्यात येते.

Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2025.03.07 18:22:12 +0530

**(मनिषा म. पाटील)**

**दिनांक – ०६/०३/२०२५    २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खेड**

# CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Order Below Exh.16 in Case No. | : | C.M.A. No. 69/2022 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original order. | | |
| Name of Stenographer | : | Smt. S.K.Kharat |
| Court Name | : | 2nd Jt. Civil Judge, J.D., Khed |
| Date of Decision | : | 06/03/2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 06/03/2025 |
| Order uploaded on | : | 07/03/2025 |